C.C. (Legal) 1912

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.),
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता. जि. ठाणे - 401 101

जा.क्र. मिभा / मनपा / नर /-४०९०/२०१९-२० दिनांक - ९०।९।२०२०

प्रति,

अधिकार पत्रधारक - मे. गुजरात इस्टेटचे भागीदार श्री. गोपालजी के. व्दिवेदी
द्वारा - सल्लागार अभियंता - मे. बी.ए.सी. प्लॅनर्स ॲन्ड इंजिनिअर्स प्रा.लि.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - गोडदेव
सर्वे क्र./ हिस्सा क्र. नवीन 108/1, 109/1,2 जुना 63/1, 66/1,2
या जागेत नियोजित बांधकामास बांधकाम प्रारंभपत्र मिळणेबाबत.

संदर्भ :- 1) आपला दि.21/11/2019 व दि.26/12/2019 चा अर्ज.
2) मे. सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील 10(3),10(5) ची व दुर्बल घटक योजनेची कार्यवाही झालेली नसल्याबाबत विकासकाने रु.300/- च्या स्टँम्प पेपरवर दि.22/12/2019 रोजी दिलेले शपथपत्र.
3) मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील अकृषिक परवानगी आदेश क्र. महसूल/क.1/टे.2/सनद/एसआर-19/2018 दि. 10/08/2018 रोजीची सनद.
4) दी इस्टेट इन्व्हेसमेंट कं.प्रा.लि. यांचेकडील क्र. EI/NOC/639/2011 दि.17/10/2011, क्र. EI/NOC/1736/2019 दि.20/12/2019, क्र. EI/NOC/637/2011 दि.17/10/2019, क्र. EI/NOC/1737/2019 दि.20/12/2019 रोजीचा नाहरकत दाखला.
5) अग्निशमन विभागाकडील जा.क्र. मनपा/अग्नि/149/2018-19 दि.26/03/2019 रोजीचा तात्पुरता नाहरकत दाखला.
6) दि.23/12/2019 रोजीचे हमीपत्र.

## -: बांधकाम प्रारंभपत्र :- (नकाशे मंजूरीसह)
## (फक्त जोत्यापर्यंत)

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 44, 45 अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 253 ते 269 विकास कार्य करण्यासाठी / बांधकाम प्रारंभपत्र मिळण्यासाठी आपण विनंती केले नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - गोडदेव सि.स.नं./सर्वे क्र./हिस्सा क्र. नवीन 108/1, 109/1,2 जूना 63/1, 66/1,2 या जागेतील रेखांकन, इमारतीचे बांधकाम नकाशांस खालील अटी व शर्तीचे अनुपालन आपणाकडून होण्याच्या अधीन राहून ही मंजूरी देण्यात येत आहे.

1) सदर भुखंडाचा वापर फक्त बांधकाम नकाशात दर्शविलेल्या रहिवास + वाणिज्य वापरासाठीच करण्याचा आहे.
2) सदरच्या बांधकाम परवानगीने आपणास आपल्या हक्कात नसलेल्या जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

